म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं.
REFBK-0004255

…मंडळातर्फे प्रसिद्ध होणारें

…प्रथम पुष्प

# " छद्मवेषी प्रचारक "

[ खंडकाव्य ]

कवि :— श्री. रजनीनाथ B. A. LL. B.

" प्रकाशक "

हणमंत गोपाळ जांभळी.

सं. रामदुर्ग

१९३०

किंमत आठ आणे.

काव्य ८८५
६२३७
१०-२-७९
ठाणे

शशिकिरण मंडळातर्फे प्रसिद्ध होणारें

प्रथम पुष्प

# “ छद्मवेषी प्रचारक ”

## [ खंडकाव्य ]

कवि :— श्री, रजनीनाथ. B. A. LL. B.

“ प्रकाशक ”

हणमंत गोपाळ जांभळी.

सं. रामदुर्ग

३०

४२५५

REFBK-0004255

किंमत आठ आणे.

## ‘ प्रिय राधे ’

दुर्धर रोगानें पछाडलें असतां शेवट पर्यंत तुझ्या मनाची शांति ढळली नाहीं. उलट तूंच मला समजूतीच्या गोष्टी सांगितल्यास :--

“ अहिल्या द्रौपदी सीता तारा मंदोदरी तथा ”

या पतिव्रतापंक्तीमध्यें असण्याची तुझी योग्यता. तुझ्याच संगतींत माझ्या ठिकाणीं काव्याचा उदय झाला. त्या तुझ्याशिवाय मी हें काव्य कुणाला समर्पण करूं? ही माझी पहिलीच कृती प्रसिद्ध झालेली पाहून तुला किती आनंद झाला असता! त्या आनंदास मी पारखा झालों. हें माझें केवढें दुर्भाग्य ?

“ रजनीनाथ ”

# सौ. राधाबाई कुलकर्णी.



जन्म १९०३. मृत्यू १९२८.

# ‘ उपोद्घात ’

अत्युग्र श्री हनूमान् कवचहि सुजनां ताप नेदीच कांहीं
जो कोणी छद्मवेषी छळक खळ तया शर्म कांहींच नाहीं
त्याला त्याचेंचि पाप प्रशमन करण्या लावितें उद्धतत्त्व
ज्ञाते हें या बुवाच्या अघटित-चरितीं पाहती शुद्ध तत्त्व

मोरोपंत[1]

१ मोरोपंत :— “ अंबरीषाख्यान ” पहिला श्लोक पहा.

# " प्रस्तावना "

श्री 'रजनानीथ' B. A. LL. B. यांनीं " छद्मवेषी प्रचारक " हें काव्य लिहिलें असून त्यास प्रस्तावना लिहिण्याचें काम मजवर सोंपविलें आहे. समाजास मार्गदर्शक होणारें हें काव्य असल्यामुळें त्यावर दोन शब्द लिहिण्याची सुसंधि मला लाभली म्हणून पुढील दोन शब्द लिहीत आहे.

श्री. रजनीनाथ यांच्या कवितेचा विशेष हा आहे कीं, त्यांची कविता, साधी सोपी व आबालवृद्धांस समजणारी असते. विनाकारण क्लिष्ट शब्दांनीं कवितेला अवजड करणें त्यांना आवडत नाहीं. कोणत्याही परंपरेचे ते अनुयायी नसून त्यांचा मार्ग स्वतंत्र आहे. बाह्यजगास त्यांची कदाचित् माहिती नसेल पण कवि या नात्यानें त्यांचा दर्जा बराच उच्च आहे हें त्यांची कविता वरवर पाहणारासही समजून येण्यासारखें आहे.

एका गोरक्षण-प्रचारकानें आपण साधु आहों असा बाहणा कसा केला, आपल्या रसाळवाणीनें लोकांवर कशी छाप बसविली, बायाबापड्यांना नादीं लावून त्यांना शीलभ्रष्ट कसें केलें, व सरतेशेवटीं, त्याचा ढोंगीपणा बाहेर येऊन त्याला काळें करून कसें जावें लागलें याचें शब्दचित्र श्री. रजनीनाथ यांनीं मोठ्या कुशलतेनें रंगविलें आहे. विषय जरी परिचयाचाच असला तरी त्याची मांडणी इतक्या ठसावदार रीतीनें झाली आहे कीं, एकदां काव्य हातीं घेतलें म्हणजे तें शेवटपर्यंत वाचल्याशिवाय राहवत नाहीं. त्या त्या प्रसंगांतून आपण प्रत्यक्ष जात आहोंत असाच क्षणभर भास होतो.

खंडकाव्याचा प्रचार मराठी वाङ्मयांत जितका व्हावा तितका झालेला नाहीं असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. केशवसुतापासून आतांपर्यंत भावगीतांचा सुळसुळाट इतका झाला आहे कीं त्यांत चांगलें कोणतें, वाईट कोणतें हें ही, समजेनासें झालें आहे

ही पतंगवृत्ति सोडून कवीनीं खंडकाव्यावर व महाकाव्यावर आपली दृष्टि स्थिर करणें अवश्य आहे. या दृष्टीनें श्री. रजनीनाथ यांचा प्रयत्न स्तुत्य व श्लाघ्य आहे. त्यांच्या कवितेनें इकडील भागाच्या लोकांना तर रंजविलें आहेच पण ती अखिल महाराष्ट्र रसिकांनाही रंजवील यांत तिळमात्र शंका वाटत नाहीं.

ता. २०-६-३०

रामदुर्ग.

J. G. Vainganka r

B. A. L. L. B.

*Sub-Judge.*

# अभिप्राय.

श्री " रजनीथ ' B. A. L. L. B यानीं रचलेलें " छक्केपंजी प्रचारक " हें खंडकाव्य वाचून पाहिलें. काव्यांतील विषय सर्वांच्या परिचयाचा आहे. सत्व, रज व तमोगुणानीं युक्त असलेल्या जगांत भोंदू लोक धुमाकूळ कसा माजवितात, बाया बापड्यानां कसें फसवितात, सद्धेतूनें निर्माण झालेल्या चळवळीला काळिमा कसा फांसतात याचें शब्दचित्र श्री. रजनीनाथ यानीं उत्कृष्टपणें रेखाटलें आहे. त्यांची अवलोकन शक्ति सूक्ष्म असून जगांतील निरनिराळ्या व्यक्तीच्या स्वभावाची पारखही त्यानां पूर्ण आहे असें दिसतें. अंध श्रद्धाळू लोक सत्य कोणतें व असत्य कोणतें याबद्दल मनाचा कौल न मागतां स्वतःच्या स्वभावाला अनुसरून गतानुगतिक बनतात व जगांत दिसतें तसें असतें या गोष्टीवर मूर्ख-पणें विसंबतात. यामुळेंच खऱ्याखोट्याची सरमिसळ जगांत होते आणि सत्याबरोबर असत्यहि मोठ्या ताऱ्यानें मिरविते या झटापटींत सत्याला पूर्ण विजयी होण्यास अनेक अडचणी येतात; कालावधि लागतो, परिस्थितीशीं झगडतां झगडतां नको नकोसे होऊन जातें. वरील तत्त्वें श्री. रजनीनाथ यानीं आपल्या काव्यांत मोठ्या कुशलतेनें आणि मार्मिक तेनें गोंविलीं आहेत.

काव्यासंबंधीं विचार करतां थोडक्यांत ह्मणावयाचें ह्मणजें असें. कवीनें सत्य सृष्टीचा पायथा सोडून गगनांत उंच भराऱ्या मारल्या नाहींत किंवा दऱ्याखोऱ्यांत अथवा सागरोदरीं नेऊन वाचकानां भ्रमित केलें नाहीं. साधे विचार, साधी मांडणी, सध्या व्यावहारिक कल्पना यानीं काव्य मनोरम झालें आहे. लिहिण्याच्या ओघांत स्वयंस्फूर्तींत अशा ज्ञानेश, तुकाराम इत्यादि साधुसंतांच्या, मन्वादि स्मृतिकारांच्या व आंग्लकविसम्राट शेक्स्पिअर याण्या कल्पना काव्यांत आल्यामुळें त्यांच्या वाचनशक्तीची व विद्वत्तेची

झाके मारल्याशिवाय रहात नाहीं. कवितेचें वृत्तहि विषयास साजे-सेंच आहे. एकंदरींत श्री. रजनीनाथ यांचें काव्य नुसतें काव्य नसून त्यांत नीतिसुमनाचा घमघमाट दरवळल्यामुळें काव्य वाचनीय, चिंतनीय व संग्रहणीय झालें आहे.

त्र्यंबक रघुनाथ देवगिरिकर.

संपादक चित्रमयजगत्

पुणे शहर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. ४२५५
काव्य ८८५

# " छद्मवेषी प्रचारक "

( चाल केशव-करणी )

शिवालयाच्या द्वारीं येउनि पथिक कुणी बैसला
( जणों तो बक ध्यानीं गुंतला )
गौरतनू तो स्थूलशरीरी, नेत्रीं काणा दिसे
तयाच्या हस्तीं वीणा असे
खादीचा तो सदरा अंगीं, तुळशी-माळा गळां
( अंतरीं ज्याळ काम कोपला )
( क्रोधशिखा ते जणो वाटले ) श्मश्रू बहु वाढली
मुखश्री कमी जरा जाहली
चराचराचा ईश दिवाकर गगन-मध्य आक्रमी
पथिकही झाला बहुत श्रमी
( चाल बदल ) कावकाव कावळे पोटीं करुं लागले
ब्रम्हांड आठवे पथिकालागी भलें
पथिकाशि सर्वही जन पाहूं लागले

होता कोणी गृहस्थाश्रमी "याहो" म्हणतो 'गृहा'
पाक तो सिद्ध जाहला पहा (१)
पांथस्थाचें भोजन झालें, ढेकर दिधला सुखें
मुग्ध तें मुख होई बोलकें
गोरक्षेचा प्रसार करण्यासाठीं आलों असे
दुजें मज कार्य जगीं या नसे
कसाबहस्तीं धेनू जाती, रक्षण करुं सज्जलों
म्हणुनि मी कार्य करूं लागलों
कीर्तन-सेवा करूं इच्छितों याचि हेतुनें अतां
सहाया करा मजाशि तत्त्वता
कीर्तनांतली सामुग्रीही पथिकांजवळी नसे
कीर्तना सज्ज जाहला असे
(चाल ब.) ते भाविक कोणी सामुग्री आणिती
कुणि तबला-पेटी आणाया धांवती
त्यांतलेचि कोणी पृष्ठिं उभे राहती
कीर्तन-सेवा सुरूं जाहली; श्रोतृवृंद थोडका
परी हरिदास बहू बोलका ( २ )
कीर्तन झालें सुरूं; बुवाची वाणी बहु गोड ते
जणों कीं सुधाचि ते वर्षते
रसाळ वाणी, पाठांतर बहु; चकित लोक जाहले
बुवाची स्तुती करूं लागले

नानापरि दृष्टांत देतसे, संतवचन घडि घडीं
मनाची उघडविली ती घडी
जिव्हाग्रीं वाग्देवी याच्या जणुं येउनी बैसली
अशी ती कथा बहुत रंगली
कीर्तन-रंगें सकळ तोषले, मान तुकाविती पहा
" असा कधिं नाहिं पाहिला बुवा "
ज्ञानेश्वर, एकनाथ, नामा हात उभे जोडुनी
बुवाच्या वाटे मज कीर्तनीं
( चाल ब. ) आजि या नगरीचें भाग्य उभें राहिलें
म्हणुनीच बुवाचे पाय इला लागले
रंकाशि प्राप्त तें निधान जणुं जाहलें
गंगा येई आळशावरी, गत तैशी जाहली
पुरी ही धन्यत्वा पावली ( ३ )
केतकि-गंधा भुलुनी आपोआप अली धांवती
कीर्तना जन तैसे चालती
श्री रामाचें सुभव्य मंदिर कीर्तन चाले तिथें
न्यूनता किमपी नाहीं जिथें
नर नारी जन बाल बालिका यांचे गण धांवती
कीर्तना ऐकायातें किती
काम सोडिलें धाम सोडिलें, कीर्तनासि चाललें
बुवानें मन ऐसें मोहिलें

सायंकृत्यें सोडुनि सारीं, सान थोर वृद्ध ते
कीर्तना सादर जन होति ते
( चाल ब. ) निशि—निशी कीर्तना रंग येतसे नवा
दिनि—दिनीं वाढतो श्रोतृ जनांचा थवा
परि-परी बुवाची थोर होत वाहवा
वाक्सरितेच्या ओघा खालीं बुडले जन सर्व ते
कशाची स्मृति त्यानां राहते (४)
"सत्पुरुषाच्या कोटीमधला कोणी आला असे"
तयातें लोक बोलती असे
"उपदेशाचा इकडेही अधिकार असे" बोलतो
जनही तेंचि खरे मानितो
थोर थोरही लोक तयाच्या उपदेशा घेति ते
दुजांची कथा काय मग तिथें
"दूध मिळेना, चहा वाढला, सोडा जनहो चहा"
बुवा उपदेश करितसे पहा
जेथें नाहीं धेनू तेथें श्री न कधीं नांदते
जाणा स्मशान सम गेह तें
( चाल ब. ) द्या सोडुनी जनहो द्या या विषवल्लिला
ऐकिली तुह्मीं ती व्यर्थचि भगवल्लिला
घ्या समजुनि घ्याहो या सद्गुरूकिल्लिला
पटला तो उपदेश चहाचीं उपकरणें फोडिलीं

( जणों वासना नष्ट जाहली ) (५)

चाल बांधुनी बुवा पहा हा नाच-नाच-नाचतो
भक्तिरस उचंबळुनि सोडितो
हातीं चिपळ्या, नाम मुखीं, हा रिंगण घालीतसे
प्रभूचा नाम-गजर होतसे
नाचुं लागला बुवा, तनूचें त्याशि मुळिं भान न
गळाली वीणा हातांतुन
श्रोतृ—वृंद तल्लीन जाहला, नामघोष करितसे
टाळ्या करीं वाजवीतसे
विस्मित झाले नर-नारी-जन मति गेली गुंगुन
जनांचे थकाचि झालें मन
रुणझुणा नूपुरीं झणत्कार होतसे
कडकडाट भारी टाळ्यांचा होतसे
भडभडा मुखांतुनि नामनाद निघतसे
कीर्तन-रंगी दंग सर्वही, घर्मही अंगातुन
न भुतो न भविष्यति कीर्तन (६)
कीर्तन-प्रेमा असा वाढला, सीमा त्याला नसे
बुवाचें जना लागलें पिसें
"प्रसाद घेण्या सदनीं यावें" जो तो हें बोलतो
बुवातें दंडवता घालितो
सायं भोजन वर्ज्य बुवाचें; दूधची त्यांना हवें

शेर वा दोन शेर तें नवें
सर्वांनाही वाटे " यावा बुवा आपुल्या घरीं
अहमहमिका चालली खरी
आठ आठ दिन अगोदरीं आमंत्रुनिया ठेविती
बुवाचे पाय तया देखिती
निशिदिनीं बुवाचें प्रस्थ असें माजलें
" या कुठें ठेवु नच कुठें ठेवुं जाहलें "
जणु परब्रह्म तें हातीं कीं गवसलें
धन्य धन्य ती जननी ऐशा रत्ना जी प्रसवली
खरोखरी धन्य जगीं जाहली (७)

३

रसिक वाचका, गोष्ट सांगतो, कर्णा इकडे करा
    आइका सावध चित्तें जरा
अज्ञजनासम आपण भांबावुनिया जाऊं नका
    मना चल होऊं देऊं नका
सुधारलेल्या जगामधिल हा सुधारलेला बुवा
    तयाचा कावा न कळे जिवा
चलाच रसिका, पाहुं बुवाची इतर वेळची तऱ्हा
    खरें तें सार शोधुंया जरा
पहा तयाची गहिरी दृष्टी, कुणी कडे धांवते
    जरा तरि लक्ष्य पोंचवा तिथें
    घडि घडीं नयन हा रमणी वरी फेंकितो
    चौकशी स्त्रियांची बुवा करित फार तो
    आशाळभूत दृष्टिनें तया पाहतो
छे ! छे ! पण ही निंदा होते " अब्रह्मण्यं शिवं "
    " प्रतिहतं भवत्वमंगलमिदं "    (८)
पहा कसा हा वक्र दृष्टीनें फिरतो गांवांतुनी
    जनाला वाटे हा कीं मुनी
सहजासहजीं करितो पृच्छा " कोण कशी हो असे ? "

आपुला उगा विचारीतसे
येथें तेथें बुवा हिंडतो, नानापरि चौकशा
विचारी गाई असती कशा
विश्वबंधुचें नातें तेथें शंका कसली भली ?
सर्वही माय-बहिण जाहली
विश्वबंधुत्वें भलें पांघरुण उपयोगा येतसे
जनाला वंद्य बुवा होतसे
सर्वही जणांना एकवचनि बोलतो
"ये बाळ" अशा या वचनीं संबोधितो
जणुं सर्वांचा हा जनक पहा शोभतो
भोळी जनता भुलली भोळ्या ( १ ) साधूच्या या वचा
धांवते मागुनिया साधुच्या (९)
भोळी जनता करि शुश्रूषा, नकोत याला मुलें
हवी त्या मृदुल मृदुल पाउलें
मुग्ध-मुखाचें मंजु बोलणें अधिक आवडे तया
हवा कंकण-रव ऐकावया
कितीक लोकां असें नाडिलें परि या कंकण-रवें
नसे कीं तत्त्व आजि हें नवें
कंकण-रव-मोहानें राज्यें पडलीं उलथोनिया
निमालीं, गेलीं पुरती लया
"साधूंची सेवाचि करावी ललनांना उक्त हें"

रा.काव्य
८८



बुवाजी सांगे त्या सार हें
हळुं हळूं तयाशीं सलगी करूं पाहतो
मृदु मृदू वचाशीं बोल बोल बोलतो
पिळदार दंड ते मधुनि मधुनि दावितो
खाल्या घरचे वासे मोजी नीच कृष्ण-सर्प हा
रसिका, शांत जरा शांत व्हा (१०)
सदसन्नर-नारींचें मिश्रण समाजांत या असें
बंधनें समाज मार्गी असे
तींच बंधनें ढिलीं जाहलीं, विकार-वश होति ते
निसर्गा विरुद्ध हो काय तें
× मांस-मद्य-मैथुनाकडे जन साहजीक धांवती
ऐसें स्मृतिकर्ते बोलती
या नियमातें अनुसरूनिया बाला फसली जरी
बुवाच्या भुलली थापा पुरी
अज्ञाण बाला छद्मवेषिचा कावा न कळे तिला
बुवाचा नाद तिला लागला
तरि काय तिची अक्षम्य चुकी जाहली?
तरि काय वदा ती बहिष्कार पावली?
अस्पृश्य काय जाहली तिची साउली?

---

× न मांस-भक्षणे दोषो न मद्ये न च मैथुने
प्रवृत्तिरेषा भूतानां, निवृत्तिस्तु महाफला ॥ मनु.

परातिसंधानांत कुशल हा बुवा कसा चांगला?
    बालिके डाग कसा लागला! (२१)

भगव्या वस्त्रा प्रत्यवाय तो कुठेंहि केव्हां नसे
    जनाचा न्याय असा दिसतसे
अंतर्भागीं परि वस्त्राच्या भलें न कांहीं दिसे
    केवला वरची शोभा असे
भगवीं वस्त्रें नव्हेत रसिका निर्मलत्व सूचक
    कल्पना आहे ही घातुक
ऐका रसिका शब्द सतीचे ऐकूं येती खरे
    कान द्या तिकडे कीं सत्वरें
साध्वी लागी भलती भाषा खपेल कैशी तरी
    आइका पतिव्रता-वैखरी
" हें सोंग बुवाजी, पुरें अतां जाहलें
जा निर्लज्जा जा मुख काळें करि भलें
ना ओरडुनी जन जमविन आळींतलें
धन्य धन्य गे साध्वि आज तूं आय तेज-दाविलें
    सतीचें सत्व खरें राखिलें (२२)

खलकृतसाध्वीछलन येथुनी झालें आतां पुरें
    तया कवि वर्णील न विस्तरें
कीर्तन सायंकाळीं, दिवसां भलते धंदे करी
    सार हें रसिकें घ्यावें तरी

सं.काव्य.
८८५



कीर्तनांतला प्रेमा दिवसेदिवस वाढतो परी
बुवाची छाप विलक्षण खरी
आंतिल मर्म कोण जाणतो भुलले सारे पहा
बुवाच्या वरपांगी वैभवा
* द्वीपिचर्म-परिछन्नगर्दभा व्याघ्र असें मानिती
जनांची ऐशीं कीं पद्धति
आडवानीं जाणा भरले सारे जन
नकलाशि अस्सल म्हणती त्या उमज न
जंबुकाशि भोळे म्हणती पंचानन
साधू भोंदू भेद कळेना, विस्मित सारे जन
तयांचें भ्रमिष्ट झालें मन (१३)
सद्दीचा हा जोर विलक्षणः भोंदू साधू गमे
तयाच्या स्थानीं मन हें रमे
सुधारलेली राष्ट्रें भुललीं, S रासपुतीना पहा
आमुची कथा काय मग अहा
थोरथोरही शिक्षित भुलता, नादीं ते लागती
अशांच्या, अमुची मात्रा किती
मोठ्या शहरांतुनिहि प्रत्यहि प्रकार हे चालती
विचारें वेडें मन तें किती

---

* वाघाचें कातडें पांघरलेल्या गाढवाला.

S हा भोंदू रशियांत होऊन गेला.

टिळाटोपिचा शिष्य वाद हा, मुळांत कांहीं नसे
खरें तें तत्व निराळें असे
सारिकाहि प्रभुची नामसाद काढिते
नर्तिका नूपुरा घालुनिया नाचते
गानींहि गाउनी जनमन आकर्षिते
दारू पिउनी नाटकांतहि तुकाराम नाचतो
भक्तिचा आव भला आणितो (१४)
गुण गुण उठली गांवामध्यें बुवा चांगला नसे
तयाची दृष्टी पापी असे
सूक्ष्म-विचारी शोधक लोकां बुवा निराळा दिसे
परि जन-समाज त्या विश्वसे
पडद्या-आडुनि लोक बोलती, धैर्य कुणाला नसे
सांगण्या "भोंदू बोवा असे"
उलट अशांची गणना झाली निंदका-मध्यें खरी
"बुवाचे निंदक" म्हणुनी पुरी
"साधू तेथें निंदक असती" या सिद्धान्तीं भर
ठेवुनी कीर्तनिं जन सादर
हळु हळू बुवाच्या कर्णीं जाई कथा
कीं निंदक काहीं निंदिनि भक्यां पथा
"का माजविता हो" म्हणें "वाद हा वृथा"
"निंदक आहे आमुची काशी, निंदक आमुचा सखा

धुतो तो अमुची वस्त्रें फुका
शिष्ट कुणी त्या विचारितातो, बुवा काय हें असें
गौडबंगाल आह्मां दिसतसे
" छे छे जनहो झूट सर्वही तथ्य यांत ना असे
वृथा आरोप घेति ते पिसे "
कर्णी तुह्मां गोष्ट सांगतो ... " हें हें ऐसें असे "
यांत हो विशेष कांहीं नसे
खात्री झाली शिष्यांची या कान-गोष्टिनें पहा
" वृथा आरोप " ह्मणती ते " अहा "
न्यायाचा हा और मार्ग कीं जनिं शोधुनि काढिला
ना कधीं ऐकियला देखिला
चोराशी नेमिती न्यायाधिश हे जन
" बा चोरी केली तुंवा काय जाणुन
तू तुझ्या निकाला टाकि बा सांगुन "
अंधश्रद्धेमधें बुवाचे दोष न दिसती जनां
मोहिलें त्यानें साऱ्या जणां (१६)
संस्था स्थापन झाली, सर्वहि यथासांग जाहलें
बुवानें ठाणें मग हलविलें
भक्तजनांचा कंठ दाटला, शोक नावरे जिवां
" पुन्हा कधिं येतां सांगा बुवा "
" एकादशिला पुन्हा येतसे, दुःखाचें कार्य न

लोक हो शांत करा तें मन ”
पुनरपि येतां जरि न दुष्ट तो तरि तें होतें बरें
कीर्तिचें होतेंना खोबरें
परि व्हायाचें होतें बहुतर आला म्हणुनी पुन्हा
कृष्णमुख दावाया या जनां
भवितव्य जगीं या कुणीं चुकविलें कधीं
होणार चुकेना देवानांहि कधीं!
या नियमबद्ध कीं जगां करितसे विधी
सर्वनियामक नियतिपुढें हा पळेल किति बापुडा
विधीचा जबर्दस्त कायदा (१७
भक्तमंडळी संगें घेउनि पंढरीस चालला
मार्गीं नामघोष लागला
नामाचें तें प्रेम विलक्षण, नाम गात जातसे
निरलस वृत्ति बुवाची असे
उदात्त ऐशा बुवालागि निंदकीं छळावें कसें
जनां आश्चर्य हेंचि होतसें
“ हृदयीं ठेवूं भक्ति-मूर्ति ही ” निश्चय करिती जन
बुवानें पुरें मोहिलें मन
धन्य बुवारे धन्य तुझी? तव इंगित न कळे कुणा
भुलविलें भलेंचि भोळया जनां
कार्तिकी संपली, परत सकळ चालले

त्या बुवालागिही बरोबरी आणिलें
साकार होउनी पाप जणो पातलें
पुनरपि कीर्तन सुरू जाहलें धन्य पुरीचें जन
कुक्कुटां टाका ओंवाळुन (१८)
विचारवंता विचार पडला काय करावें अतां
कशी ही व्याद टळे तत्वतां
गोरक्षेच्या नांवा खालीं अबलानां मोहितो
तया दुर्नीतीतें लावितो
गोरक्षेची कास बांधली लक्ष्य लागलें परी
१ नराच्या सुंदर शत्रूवरी १
हस्तीं पूजा करी प्रभूची, पाय दिलासे परी
शिशूच्या कोमल मानेवरी
हातीं परिमल तोंडीं विष्टा रुचेल कोणा तरी
बुवाची रीत अभूता खरी
हें काय सज्जना संमत हो होईल ?
गोरीची गंगा कोण शिरीं घेइल ?
लत्तेतें खाउनि अन्ना स्वीकारिल ?
सहस्त्र गाई रक्षुनि अब्रू एकीची नासली
कशी संमता जनां जाहली ? (१९)
विचार ऐसा कितीक करिती धैर्य होईना परी

१ The fair enemy of man.

आणण्या मात चव्हाट्या-वरी
कोण स्वतः जन अपुली अब्रू बाहेरी आणिल ?
शिळा पदिं कोण स्वतः टाकिल ?
त्यांतचि उठला एक महात्मा, धैर्य तयाचें खरें
बुवाचें चित्त करी घाबरें
रोखठोक प्रश्नाशिं विचारी "पापदृष्टि पामरा
सांगरे प्रकार सारा खरा
ढोंग्या कसली बसलाशी गोसंस्था ही घेउनी
हवी तुज पुष्पवती कामिनी
आलाशि घरोनी धैर्य पुन्हा तूं परी
शिरलाशि दरींतचि व्याघ्राच्या सत्वरीं
माझ्याशि गांठ तव आहे ध्यानीं धरीं"
अनपेक्षित हे शब्द ऐकुनी घाबरला तो पहा
बुवाचें तोंड उतरलें अहा (२०)
घाबरला परि हात जोडतो "अपुलें मी लेंकरूं
नकाहो भलती निंदा करूं
हात जोडितों, पदर पसरतों, शांत जरा शांत व्हा
मजवरी भलता आरोप हा
काय बुवाची शांत वृत्ति ही ! धन्य धन्य देह तो
निंदका हात पहा जोडितो
साधूचें तें सोंग घेतलें, योग्य अनुकृती करी

जना पाडिली मोहिनी पुरी
" मात्रागमनी वत्स असें हें आईसह कापिन "
महात्मा वदतो संतापुन
परि शांतपणाचें सोंग चाळवी बुवा
निर्लज्ज खरा हा दिसतो मजला पहा
एकही मुखांतुनि कटुवच येइ न अहा
पुनरपि भुलले जन या सोंगा, म्हणती " आरोप हा
बुवा अकलंक आमुचा अहा (२१)
सात्विक कोणी गृहस्थ होता सरलवृत्तिचा भला
उपाधि न ठावी कधिं त्याजला
शांतपणें आयुष्य घालवी, न करी पंचाइत
कुणाची, आत्मकार्यिं जो रत
दुसऱ्याच्या छिद्रा न पाहतो उणें न बोले कुणा
क्षमेच्या बांधी करि कंकणा
असला नर हा गोष्ट सांगतो " जनहो ऐका जरा
बुवाच्या अद्‌भुत रूपांतरा
मी असतांना, पत्नीतें मम निरोप धाडी पहा
खरें तें धैर्य बुवाचें अहा
सुज्ञहो, विचारा गोष्टीच्या या करा
ही अंधश्रद्धा या वरि तरि आवरा
सांगतों हिताचा मार्ग तुम्हां मी खरा

चक्षुःसत्यं गोष्ट मांडिली तुमच्या पुढती असे
यांतहो मिथ्या कांहीं नसे २२

जनतेचें परि लक्ष्य न तिकडे, फटाळुनि लाविती
वचा या: धन्या यांची मती
धिःकारिति त्या कटु वच बोलुनि म्हणती मिथ्या असे
तुह्मातें वेड लागलें दिसें
आत्म-घातकी वच ऐसें हें बोलूं सुद्धा नका
आपुला प्रयत्न आहे फुका
बोवाजीनें पुरें भारिलें जनते-लागीं अहा
खरा कीं जादुगार हा पहा
जनतेची ती विवेक शक्ती लुप्त जणो जाहली
बुवानें जाळुनिया टाकिली
जनरूपी सर्पा मंत्रें जणुं मोहिलें
त्या पिशाच्चाशि कीं वश करुनी घेतलें
म्हणुनीच जनांनीं सत्या धिःकारिलें
परि सत्याच्या या उपमर्दा ईश कसा पाहिल ?
कसा या अन्याया साहिल ? ( २३ )

त्या दिवसाचें दृश्य तुह्माला दिसतें रसिका जरी
शहारे येते अंगांवरी
न्यायाचा जणुं खून जाहला, अन्यायाचा जय
प्रभूच्या कीर्तीचा कीं लय

शिष्ट शिष्ट मंडळी बैसली मूग गिळोनी तिथें
नयातें घालुनिया पालथें
१ कृष्णेला भरसभेंत जेव्हां ओढुनिया आणिलें
खळानें वस्त्र तिचें फेडिलें
भीष्म-द्रोणादिकही तेव्हां स्वस्थ असें बैसले
खळाचे मिंधे ह्मणुनी भले
तैसाचि रसिक हो प्रकार हा जाहला
धर्मासि जणों तो अग्नि कीं लागला
सैताना जणुं अधिकार जगाचा दिला
२ "इतिहासाची पुनरावृत्ति होते" हें सत्य कीं
मिळालें प्रत्यंतर छान कीं (२४)
एवं विजयी असत्पक्ष हो, सत्याचा अपजय
विचारा झाला पुरता लय
असत्पक्ष बोलका, विचारें सत्य उभें तें मुकें
जणों कीं मूलचि तें पोरकें
परि ईशाचा अंश सत्य हा, तेजस्वी निस्तुल
तयाचें अजिंक्य आहे बल
अधर्म होई तात्पुरता जरी विजयी, तरी धर्म हा
शेवटीं विजयी होई पहा
बहुमत नलगे सत्यालागीं; विजयी हो एकला

१ द्रौपदीला. २ History repeats itself.

प्रभू दे धीर सदा त्याजला
मूकाशि सत्य हें वाचालातें करी
पंगूशि शक्ति दे ऊंघायाते गिरी
सत्याची जागें या कास धरावी खरी
परमानंद प्रभुचें आहे आवडतें बालक
सत्य हें ईश तया पालक (२५)
जयंति-नगरीं राज्य करितसे रामराय तो पहा.
खरा कीं ईशाचा अंश हा
सारा-सार-विचारी, तत्पर लोकपालनीं असें
सदा ताचितीं जनहित वसें
स्वसुखाचा अभिलाष नसे त्या, जनतेची काळजी
सदा त्या इच्छा नाहीं दुजी
परंपरा राखुनी योग्य त्या सुधारणा हा करी
योग्य तें जुनें नवें स्वीकरी
थोर पुरीचें भाग्य ह्मणोनी ऐसा नृप लाधला
विचारी, न्यायी, विनयी, भला
त्या पुढें जाउनी सत्य उभें राहिलें
नृपकर्णीं सर्वहि भूतवृत्त घातलें
'बा न्याय करि, ह्मणें अनृतें मज गांजिलें
ऐकुनी वार्ता, दचके नृप तो, आर्द्रचित्त जाहला
"व्यवस्था करितों" बोले "चला" (२६)

क्र. नं. ४२५५ शाखा

असत्पक्ष हा विजयी एकडे, धुंदीमध्यें असे
    कीर्तना सादर झाला असे
कीर्तन कसलें? निंदकानिंदा हाचे विषय तेथला
    बुवाजी करितो शब्दच्छला
अधिकारी-वर्गाची निंदा, शिक्षित-निंदा तशी
    कीर्तनीं निंदा चाले अशी
उपास करुनी " हनुमानाचें कवच धरूं इच्छितो
    निंदका भस्म करूं पाहतो
लोकहि म्हणती " निंदकजनहो सावध आतां असा
    तुम्हासह उडविल नातरि रसा *
    जा क्षमा जाउनी मागा या साधुची
    नातरि नसे मुळिं धडगत हो तूमची
    ठेविला असे निंदका आतां नरकची
निंदक परी ते शांत अढळ, त्या भीती कांहीं नसे
    निमग्नचि आत्मानंदी असे (२७)
अशा रीतिनें तीन दिवस तें कीर्तन झालें पुन्हा
    बुवाला वाटे पडला गुन्हा
स्थिरस्थावर, प्रशांत सगळें झालें वाटे तया
    गेलें प्रकरण सारें लया
राखेमाजी अग्नि दडाला, पाय बुवानें दिला

* पृथ्वी.

‘ विझाला ’ वाटे कीं त्याजला
परी धुमसतो अंतर्भागीं मूर्खाला ना कळे
वाटलें सर्व हि त्या बावळे
अंतरीं हसतो “ फत्ते झालीं आजि खरें जिंकिलें
भलें बावळ्या जनां फसविलें ”
परि नाश पातला जवळी न कळे तया
कोणाचें आधीं कळे मरण जगति या
दुर्दैव न येई दुर्गति सांगावया
हांस, हांस, रे हसुनी घेई, थोडे उरले दिन
पोटभर घेई वा हासुन ( २८ )
मंगल मंगलवार उगवला, शांत दिसे सर्वही
हलेना झाडाचें पर्णही
काय जाहलें बुवाशि आजी. तोंड कांहो उतरलें?
इतकें म्लान कसें जाहलें?
मंगलवारीं काय अमंगल झालें? म्हणुनी असा
बुवा फटफटीत जाहला कसा?
भक्त-मंडळी विचारिताती “ काय जाहलें बुवा? ”
मुखांतुनि शब्द निघेना अहा
भक्तालागीं कोडें पडलें “ कायतरी जाहलें ?
समंधें काय बुवा ग्रासिले ?
कडकडोनि विद्युत्पात काय जाहला

कां शीर्षीं याच्या पर्वत पडला भला
कां मर्मीं असिचा घांव कुणी घातला "
" आ " पसरोनी स्तब्ध सर्वही, कळे कुणा कांहिं न
तयांचें स्तंभित झालें मन (२९)

चला रसिक, परि बाजाराची वेळ जाहली अतां
करूं य बाजारा तत्वतां
घटकेचा संसारहि आहे बाजारचि हा खरा
सुज्ञहो न्यायें सौदा करा
बोवाजींचा सौदा फसला अन्यायानें खरा
अनीति कधींहि न स्वीकरा
ऐका, जन हें काय बोलती, बुवाचेंच हें असें
कान द्या रसिका, तिकडे कसें
वरूनि म्हणे कीं हुकूम आला " काळें आतां करा
बुवाजी, नातरि शिक्षा वरा "
हें काय अहो जी अघटित आजी घडे
हा असा अकल्पित घाला कैसा पडे
कुणीं दुष्टें ऐसा डाव साधिला गडे
१ अत्यद्भुत मार्गानें फुटते खुनासि वाचा खरी
तयाला जिव्हा नाहीं जरी १ (३०)

---

१ For murder though it hath no tongue will speak
With most miraculous organ.

Hamlet Act II 2.

कोण असा परि उन्मन इकडे भटके, पाहूं चला
बुवाचें पिशाच्च दिसलें मला
शब्द निराळीं निघतो ऐका करुणस्वानें अहा
बुवाचा मृतशब्दचि हा पहा
" सुरभिदेवि-सौभाग्य-मंदिरा अग्नि कसा लाविता?
तियेतें यवन-करीं अर्पिता ? "
पुरे बुवाजी, सुरभिदेवीचें सोंग अतां आवरा
सत्वरीं काळ येथुनि करा
हनुमानाचें कवच उलटलें, बसलें मानेवरी-
बुवाच्या जाउनिया सत्वरी
सर्पाचें विष कीं सर्पाला बाधलें
नापिकारि त्याच्या शस्त्रें कीं छेदिलें
त्याचेचि पाय त्याच्याच गळां पातले
व्यर्थ अस्त्र हें गेलें नाहीं ज्यानें त्याच्यावरी
प्रभूची अगाध लीला खरा (२१)
चपलेसम ही मात पसरली ग्राममध्यें पहा
दचकली भक्तमंडळी अहा
सर्व पांगले इकडे तिकडे. बोवाचे सोबती
थोडके आतां कीं राहती
मनू बदलला, काळहि फिरला, फिरले जनही तसे
तयांची पगडी फिरली असे

कोणी म्हणती, " जाउनि मांडू अपुली बाजू पुढें "
बुवा हा नाहक आमुचा बुडे
परी बुवाचें धैर्य होइना, भक्त म्हणति जरी " चला "
तयाचें मन खाई त्याजला
करचरण तयाचे गळले आतां पहा
अंगावरि कांटा उभा राहिला महा
त्या कळलें कीं " ना चले लपंडाव हा "
न्याया-पुढती अन्यायाचे डोळे दिपले खरें
अनृत तें झालें कीं घाबरें (३२)

## ( साकया )

असाल रसिका, दमला आतां, चला फिराया जाऊं
एक दृश्य आणखी पाहुनी विश्रांतीतें घेऊं
रजनीनें अंधार पसरिला, दिसे न आतां कांहीं
असे कृष्णपक्षाची रात्री, विधुचें दर्शन नाहीं
दृष्ट बुवाची होइल म्हणुनी रजनी प्रियकर अपुला
झांकुनि घेई पदरांखालीं, ऐसें वाटे मजला
कृष्णवस्त्र नेसुनी निशा ही साम्राज्या तें करिते
विश्व बुडविलें तमीं इयनें, दृष्टी फोलचि ठरते
चोरजार-पापी-लोकांचा सुळसुळाट तो झाला
कृष्ण-कृत्य करण्यास निशेने परवाना जणुं दिधला

रातकिड्यांचा किर शब्दही आतां ऐकूं येतो
घुबडांचा घूत्कार भयप्रद मधुनी मधुनी घुमतो
मसणामध्यें भूतपिशाचें आनंदें बागडती
दुर्दैवी शुनकें ग्रामाची सूर काढुनी रडती

थांबा रसिका, ऐका, कसली धडधड ऐकूं येते
गाडी येते, मागुनि तीच्या, जनही येताती ते
आड होउं या जरा रसिकहो, पाहुं काय हें चाले
हा तर बोवा दिसतो, मागुनि भक्तमंडळी चाले
हळुंहळुं कांहीं कुजबुजताती, कंदीलहि मालविला
दिवाभीत हे, प्रकाश यानां खपतो तो हा कसला ?
"भरीस तुम्हीं न घालिता जरि तरि होतें न असें हें
असो, असूंद्या लोभ; स्वर्गी येतो परतुनि पाहे"
भक्त जनांचा कंठ दाटला; शब्द मुखांतुनि न फुटे
निरोप देती मौनवृत्तिनें "लागा आतां वाटे"
भक्तोलागी कळलें बोवा आतां येतो कसला
जेथुनि परतुनि येणें नाहीं स्थाना ऐशा गेला
गुरुभक्तांचा अपूर्व संगम पाहुनि घ्या रसिका, हा
संगम कसला स्मशानयात्रा बोवाजीची पहा
गाडी गेली; भक्त परतले; सर्वें न कोणी गेला
विपत्कालीं कुणि नसें कुणाचें, जो तो अपुला झाला

सुरभिदेविचा प्राणनाथ हा गेला अपुल्या मार्गें
उशीर झाला तुम्हाशि रसिका, परता आतां वेगें
सुरभिदेवि-सौभाग्यतिलक जणु दृष्टें कोणी पुशिला
कोणी म्हणती "बरें जाहलें, मोठा पापी गेला"
कोणी म्हणती "वाइट झालें, आला कार्या घाला
ऐसा चालक गोसंस्थेचा नाहीं कधीं देखियला"
कोणा संस्था प्रियकर झाली, नीतिबंधनें कोणा
कुणी निंदिती, कुणी वंदिती, चाले हा धिंगाणा
जन हें द्विमुखी श्वापद आहे, एकवृत्ति ना त्याचा
मतामतांची ओरड ऐशी सदाचि चालायाची
कलंक लावुनि आर्यसतीच्या अक्षय सौभाग्याला
सुरभिदेविचें रक्षण परि कधिं संमत ना सुजनाला
नीतीचीं बंधनें तोडुनी गोरक्षण करि कोणी
देशघातकी, दुर्बुद्धी तो; काल तयातें हाणी
* अंगावरचीं वस्त्रें जाळुनि शेकत कोण बसेल ?
बैल विकोनी गोठा करण्या कोण सुज्ञ धांवेल ?
घर मोडोनी मांडव करण्या तयार होइल कोण ?
हात-शिजवुनी अपुला आपण क्षुधा निवारिल कोण ? *
सुरभि-देविच्या संस्थेचाही प्रकार ऐसा झाला
कलंक-दुष्टा गोसंस्था ती हवी कशी कोणाला ?

---

* ह्या कल्पना ज्ञानेश्वरीतून घेतल्या आहेत.

## दिंडी

हिंदमाते, तव दैव असें खोटें
म्हणुनि न सरे दुर्दशा तुझी वाटे
देशबुडवे लोक हे निपजताती
तुझ्या नांवा काळिमा आणिताती
देश-सेवक हरिभक्त अनधिकारी
छद्मवेषें फिरतात दुराचारी
अज्ञ-लोकां नादाशीं लाविताती
कार्य एकही होइना अशा हातीं

समाप्त.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ४२५५
REFBK-0004255
REFBK-0004255